दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## धनंजय मुंडेंविरोधात सुरेश धस पुन्हा आक्रमक

**बीड**–बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यात आरोप – प्रत्यारोप अद्यापही सुरूच आहेत. दरम्यान सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. त्यामुळे दोघात वाद मिटला असल्याचे बोलले जात असतानाच दुसरीकडे धस यांनी पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला आहे. या संदर्भात आमदार सुरेश धस यांनी कृषी विभागाला एक पत्र पाठवून तेलबियांच्या उत्पादकता वाढी संदर्भात धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती मागितली आहे. यात कापूस, सोयाबीन तेल बियांची उत्पादकता वाढवण्यासाठीच्या पत्रव्यवहाराची माहिती देखील मागवण्यात आली आहे.एकीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणात आमदार सुरेश धस हे धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करत असताना या दोन्ही नेत्यांमध्ये भेट घडवण्यात आली. त्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणातून माघार घेतली असल्याचा आरोप त्यांच्यावर केला गेला.

# मुलींच्या फीमाफीसाठी मंत्री पाटील १०० कॉलेजांना अचानक भेट देणार

## मुलींना मोफत शिक्षण योजनेची अंमलबजावणी होत नसल्याच्या अनेक तक्रारी



**पुणे (वृत्तसंस्था)**

महायुती सरकारने मुलींसाठी मोफत शिक्षण योजना जाहीर केली. मात्र, त्याची शंभर टक्के अंमलबजावणी होत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्याची दखल घेऊन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील क्शन मोडवर आले आहेत. त्यांनी शुक्रवारी पुण्यातील गरवारे कॉलेजला अचानक भेट देऊन मुलींना फीमाफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. लवकरच राज्यातील १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे यासाठी राज्य सरकारने व्यवसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ अभ्यासक्रमांसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूदही केली. या निर्णयाच्या अंमलबजावणीतील शैक्षणिक संस्थांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी शासनाने दिशानिर्देशदेखील जारी केले होते. तसेच उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून भरारी पथक नेमून विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल घेतली जात होती. सदर निर्णयाचा आतापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला याचा प्रत्यक्ष आढावा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेण्यास सुरुवात केली आहे.राज्यभरातील शंभर कॉलेजांना अचानक भेट देऊन मुलींच्या फीमाफीचा आढावा घेणार असून मुंबईतील वांद्रे येथील थडोमल शहानी कॉलेजपासून या मोहिमेला सुरुवात केली. पुण्यातील गरवारे दुसरे कॉलेज असल्याचेही मंत्री पाटील यांनी सांगितले. 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थ्यांचा भत्तावाढीची मागणी झाली तेव्हा यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन पाटील यांनी दिले. या वेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्छाव उपस्थित होते.




# मूकबधिर निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांची गरुड झेप !

## राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा समाज कल्याण कार्यालय व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धा दिनांक १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी गेवराई येथे संपन्न झाल्या. यात जनार्थ, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मूकबधिर निवासी विद्यालयाने विविध किडा प्रकाराच्या स्पर्धेत यश संपादन करत राज्यपातळीपर्यंत मजल मारली आहे. विद्यालयाच्या कुमारी विद्या रमेश तोंडे, वयोगट ८ ते १२ लांब उडी प्रथम , कुमारी अश्विनी कैलास तनपुरे वयोगट १३ ते १६ ,१०० मीटर धावणे प्रथम क्रमांक, आणि लांब उडी या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांकाने विजेती ठरली



आहे. या दोघींची ही राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.मुलांच्या स्पर्धेत चि. साद अमर शेख वयोगट ८ ते १२ लांब उडीत तृतीय क्रमांकाने जिंकला आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना सुवर्ण व कास्यपदक प्रमाणपत्र देऊन सन्मानित समाज कल्याण अधिकारी श्रीमती मेश्राम मॅडम व श्री नखाते साहेब यांनी विजेत्यांना सुवर्ण व कांस्यपदक तसेच प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले .

विशेष बाब म्हणजे महिला कर्मचाऱ्यांसाठी वन मिनिट्स स्पर्धेमध्ये श्रीमती हिंगे अशा नारायण कला शिक्षिका यांनी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवत ५५५५ रोख रक्कम सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र मिळविले आहे. सर्व विजेत्यांचे वरिष्ठ अधिकारी संस्थेचे संस्थाचालक श्री विकास देविदासराव कदम साहेब मुख्याध्यापक मॅडम श्रीमती सूर्यवंशी डी .डी.यांनी अभिनंदन केले. यासाठी विशेष शिक्षक श्री सोळंके अण्णासाहेब , श्री सोळंके महेश, श्रीमती हिंगे अशा, श्री काळे योगेश, श्री होके सत्यप्रकाश , शाळेतील सर्वांचे विशेष मार्गदर्शन आणि परिश्रम केले.

## श्री घृष्णेश्वर मंदिराला जाणाऱ्या रस्त्याचा तातडीने विकास करण्याची मागणी मा.केंद्रीय मंत्री रामेश्वर तेली

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

श्रीक्षेत्र वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिराला जाणारे रस्ते हे अतिशय निकृष्ट अरुंद व अतिक्रमणयुक्त असून यामुळे आभाविकांचे मोठे हाल परिसरातील रस्त्यांचा तातडीने विकास करावा अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे माजी केंद्रीय मंत्री व विद्यमान राज्यसभा सदस्य रामेश्वर तेली यांनी माजी केंद्रीय मंत्री रामेश्वर तेली यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केली आहे. माजी केंद्रीय मंत्री रामेश्वर तेली हे नुकतेच एका खाजगी कार्यक्रमासाठी आले असता ते श्री क्षेत्र वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर दर्शनासाठी आले होते. यावेळी मंदिर परिसरातील परिस्थिती पाहून ते अवाक झाले या ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना




अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले या ठिकाणची परिस्थिती पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ११ फेब्रुवारी रोजी एक पत्र पाठवून मंदिर परिसरामध्ये ज्येष्ठ नागरिक दिव्यांग व्यक्ती यांना कोणत्याही सुविधा नसल्याचे नमूद करून मंदिर परिसरामध्ये सुगमतेने येण्याजाण्यासाठी व्यवस्थित रस्त्याची निर्मिती करण्याची तसेच आपणही केलेल्या मागणीवर शिग्रतेने कार्यवाही करून मान्यता देण्याची मागणी केली आहे. अनेकावेळा श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरात विविध सुविधा उपलब्ध करून देण्याची तसेच मंदिर परिसर अन्य ज्योतिर्लिंगाच्या धरतीवर विकसित करण्याची मागणी अनेक वेळा केली आहे.

## अंबाजोगाई शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात होणार साजरा-महेश काका लोमटे

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई शहराती शिवजन्मोत्सव दि.१९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे मागच्या काही दिवसापूर्वी शिवजन्मोत्सव पूर्व तयारीसाठी शिवभक्तांनी बैठकीचे आयोजन केले होते आयोजित बैठकीत विविध सामाजिक उपक्रमांनी शिवजन्मोत्सव साजरा करण्याचे एकमताने ठरवले यावेळी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली पदांच्या नियुक्ती करण्यात आल्या होत्या अंबाजोगाई शिवजन्मोत्सव अध्यक्षपदी रणजीत चाचा लोमटे यांची निवड झाली होती शिवभक्तांनी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी जीवाची बाजी लावत जयत्त तयारी केली आहे ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात विविध उपक्रम साजरा होणार आहेत उत्कृष्ट ढोल ताशा पथक अंबाजोगाई शहरात येणार आहेत शिवजन्मोत्सव सोहळासाठी आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे शिवजन्मोत्सव अंबाजोगाई वतीनी सांगण्यात आले आहे.



## शिक्षक आणि विद्यार्थी यांचं नातं अत्यंत निर्मळ सहवासाचं असतं-सहशिक्षक गजानन बुधवंत

**जालना । असलम कुरेशी**

शिक्षक व विद्यार्थी हे कुटुंबानंतर सर्वाधिक काळ एकत्र राहत असतात. त्यांना एकमेकांची एवढी सवय लागते, की त्यांच्यात एक अतूट नाते निर्माण होते. आयुष्यात माणसाने माणसे कमवावी. शिक्षक म्हणून प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांना योग्य मार्ग दाखवण्याचे काम करावे, असे विचार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कावजवळा येथील इयत्ता सातवीच्या २००५-०६ च्या बॅचच्या स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांचे सहशिक्षक असलेले गजानन बुधवंत यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक छबुराव भांडवलकर होते, तर



गजानन बुधवंत, अशोक माने, सखाराम मुजमुले, सखाराम मानकर हे सर्व शिक्षक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

२००५-०६ साली असलेल्या इयत्ता सातवीच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बहुतेक माजी विद्यार्थी सहभागी झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमात मोकिंद गायकवाड, शिवप्रताप सावंत, शंकर भांडवलकर, दत्ता सावंत, परमेश्वर भांडवलकर, सोपान भालेकर, पांडुरंग दाभाडे, नामदेव घाडगे, अमोल सावंत, कृष्णा जाधव, शंकर पवार, शामल तरासे, रुपाली तरासे, गीता तरासे हे माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व मित्र मैत्रिणींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यावेळी असलेले शाळेचे शिक्षक गजानन बुधवंत, अशोक माने, सखाराम मुजमुले, मानकर यांनी परिपाठ घेऊन स्नेहसंमेलनाची सुरूवात केली. विद्यार्थी शिक्षकांच्या भाषणावेळी अनेक वेळा मने गहिवरून येत होती. सर्व शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांना बहुमोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम भांडवलकर यांनी तर आभार प्रदर्शन अनंत मगर यांनी केले.

# शासनाकडून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी ;सणासुदीच्या काळात जनतेला सोसावी लागेल अतिरिक्त आर्थिक झळ !

## शासनाने गहू बंद करून ज्वारी देऊ नये राशन कार्ड धारकांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शासनाकडून या महिन्यापासून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर भारी असून शासनाला राशन कार्ड धारकांना ज्वारी द्यायचीच असेल तर ती गव्हा ऐवजी नको तांदळा ऐवजी देण्याची मागणी होण्याची शक्यता दिसून येत आहे. राशन दुकानावरून गहू बंद केल्यास सर्वसामान्य गोरगरीब जनतेला सणासुदीच्या काळात अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत राशन कार्ड धारका कडून होताना दिसत आहे. शासनाने राशन दुकानांवरून राशन कार्ड धारकांना आता गव्हा ईंवजी ज्वारी देण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील राशन दुकानांवर गहू न येता त्या ऐवजी ज्वारी आली आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य गोरगरीब राशन कार्ड धारकांमध्ये मोठ्या प्रमाणात उलट-सुलट चर्चा होऊ लागली आहे. त्यातच इस्लाम धर्माचा रमजान महिना पुढील मार्च महिन्याच्या दोन तारखेपासून सुरू होणार आहे. रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील महिला, पुरुष, तरुण-तरुणी वृद्ध सर्वच जण रमजानचे रोजे धरतात. रमजान महिन्यात रोजा असताना मुस्लिम समाज शक्यतो पहाटे सहहरीसाठी तसेच दिवस मावळताना रोजा सोडल्यानंतर जेवणासाठी गव्हाच्या पोळ्यांबाच जास्त उपयोग करतो. मुस्लिम समाजातील रोज़ेदार रमजानच्या महिन्यात ज्वारीची भाकर बनवीत नाही आणि खातही नाही. नेमके याच काळात शासनाकडून राशन दुकानावर गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात नाहाजी व्यक्त होऊ लागली आहे. याशिवाय येत्या एप्रिल महिन्यात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सुद्धा येत आहे. यामुळे फेब्रुवारी ते एप्रिल या तीन महिन्याच्या कालावधीत मोठ्या संख्येने




असलेल्या दलित मुस्लिम समाजाच्या भावना लक्षात घेता शासनाने गहू बंद करून ज्वारी देऊ नये तसेच शासनाकडे जर ज्याही मोठ्या प्रमाणात शिल्लक असेलच तर शासनाने ती गव्हा ऐवजी न देता तांदळा ऐवजी दिली तर एक वेळ ठीक आहे. परंतु असे न करता गव्हा ऐवजीज्वारी पाठविण्यात येऊ नये, अशी मागणी राशन कार्ड धारकांमध्ये मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. शासनाने याकडे जातीने लक्ष देऊन ऐन रमजान महिन्याच्या तोंडावर तसेच आगामी आंबेडकर जयंतीकडे लक्ष देऊन अन्नधान्याचा पुरवठा करावा नसता जनतेतून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण राशन दुकानावरून गहू बंद केल्यास ऐन सणासुदीच्या काळात बाजारपेठेत गव्हाचे दर वाढतील. ज्यामुळे सर्वसामान्य गोरगरीब जनतेला अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत गोरगरीब व सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

## संपादकीय..

# योगींच्या दक्षतेने अमृतस्नान सुरक्षित



प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात अग्निकांड झाल्यावर आणि त्यात ३० लोक ठार झाल्यानंतर आता प्रशासन आणि मुख्यतः योगी आदित्यनाथ सरकार अत्यंत सजग झाले आहे. योगी आदित्यनाथ यांनी परिस्थितीची समीक्षा केल्यावर तेथील देखरेख व्यवस्थेवर नव्याने पाहणी केली. योगी आदित्यनाथ यांनी प्रशासनावर संपूर्ण देखरेख ठेवतानाच अत्यंत महत्त्वाचे विधान केले आहे. ते म्हणाले की, जेथे श्रद्धा असते तेथेच सनातन धर्म असतो. वसंत पंचमीच्या दिवशी कोट्यवधी भाविक स्नान करण्यासाठी जमणार असून यावेळी कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. वसंत पंचमी ही मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते आणि प्रयागराज येथे तर हा सण अत्यंत मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे हे पर्व साजरे करण्याचा दुर्मीळ योग जुळून आला आहे. उत्तर प्रदेश प्रशासन आणि स्वतः योगी आदित्यनाथ व्यवस्थेवर देखरेख करत आहेत ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. रेल्वेबरोबर समन्वय साधून भाविकांच्या येण्या-जाण्याच्या वेळेला विशेष ट्रेन्सची व्यवस्था तसेच त्यांचे आगमन वगैरे सुनिश्चित केले जावे. वास्तविक जेथे प्रचंड संख्येने भाविक येत असतात तेथे अशा घटना घडतात हे गृहीत धरून तेथे तशी काळजी घ्यावी लागते.

महाकुंभ हा १२ वर्षांनी एकदा येणारा पवित्र स्नानाचा मुहूर्त असल्याने येथे अफाट गर्दी होणार हे गृहीतच आहे. तशी व्यवस्था मोदी आणि योगी सरकारने केली होती यात काही शंकाच नाही. म्हणून तर कोट्यवधी लोक स्नानासाठी जमूनही केवळ ३० लोक मृत्युमुखी पडले. अर्थात एवढेही मृत्यू व्हायला नकोतच. पण लोकांची भक्ती आणि व्यवस्थेची दुर्बलता येथे उघड झाली हे दिसते. १९५४ आणि २०१३ मध्येही अशाच दुर्दैवी घटना घडल्या होत्या आणि त्यात कित्येक लोकांचे जीव गेले होते. त्यांची पुनरावृत्ती टाळण्याचे अनेक उपाय योजले गेले. या घटनांनी गर्दीचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय बेपर्वाई यांना उघड केले गेले. यामागे भारतातच होणाऱ्या धार्मिक आयोजनांमध्ये अशा चेंगराचेंगरीच्या घटना घडतात. देशात नेहमी यात्रा असोत की कुंभ यांसारखे धार्मिक कार्यक्रम आणि त्यात होणारी लोकांची प्रचंड गर्दी हे समीकरण असतेच. त्यात या गर्दीचे व्यवस्थापन करण्याची यंत्रणा अद्याप तितकीशी सुधारलेली नाही. त्यामुळे अशा घटना नेहमीच घडलेल्या दिसतात. यात सत्ताधारी पक्षांचा काही दोष नसतो. जो त्या वेळी सत्तेत नसतो तो त्यावेळी प्रशासनावर किंवा सरकारवर आरोप करतो. पण गर्दी इतकी अफाट असते की, कुणाचाच दोष काहीही नसतो. भारतीयांची अफवांवर विश्वास ठेवण्याची प्रचंड वृत्ती हीच कारण आहे.नुकताच जळगावजवळ एक रेल्वे अपघात घडला आणि त्यात समोरून पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याची अफवा पसरली आणि त्यात थांबलेल्या गाडीतून हजारो प्रवाशांनी रेल्वे ट्रॅकवर धडाधड उड्या घेतल्या. त्यात पुष्पक एक्स्प्रेसखाली येऊन १५ प्रवाशांचा मृत्यू झाला. अशाच घटना अफवांवर विश्वास ठेवण्याच्या आपल्या वृत्तीमुळे घडतात. महाकुंभ यात्रेवर प्रचंड पैसा खर्च करण्यात आला आहे. पण सरकार आणि प्रशासन यात्रेदरम्यान चेंगराचेंगरीच्या घटना रोखू शकले नाही. जेथे गर्दी असते तेथे अशाच घटना होत असतात असे सांगून प्रशासन आपली जबाबदारी टाळू शकत नाही. मुस्लीम देशांतही हज यात्रेच्या दरम्यान अशाच घटना घडत असतात, पण मोदी आणि योगी सरकारसाठी हे शोभादायक नाही. योगी खासकरून देखरेख करत आहेत आणि त्यांची महाकुंभमधील आगामी कार्यक्रमांवर प्रचंड देखरेख आहे. त्यामुळे एवढे होऊनही तेथे मनुष्यहानी तितकीशी नाही. तरीही झाली ती घटना वाईट आहे आणि भविष्यात तशी घडू नये म्हणून योगी प्रशासन शक्य तितकी काळजी घेत आहे. आता महाकुंभ यात्रेवर एवढा प्रचंड खर्च करण्यात येत असूनही जनमाणसांचे नुकसान झालेच असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. कारण एवढी गर्दी जेथे जमते तेथे अशा दुर्घटना घडतच असतात हे गृहीत धरायला हवे. पुढे अशी घटना घडू नये याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी.प्रयागराजमध्ये इतक्या वर्षांनंतर होणाऱ्या या महाकुंभ पर्वाला दुर्घटनांपासून वाचवू शकले नाही ही खंत आहे. एक तर १० कोटी लोक स्नानासाठी येतात आणि त्यांच्यासाठी पुरेशी व्यवस्था नव्हती असे म्हणणे योग्य नाही, पण योगी आदित्यनाथ असोत की, उत्तर प्रदेश प्रशासन यांची इतक्या प्रचंड संख्येने गर्दीचे व्यवस्थापन करण्याची क्षमता होती की नाही असा प्रश्न यामुळे उपस्थित झाला आहे. आता योगी सरकार काळजीपूर्वक लक्ष देऊन भविष्यात तरी अशा दुर्घटना घडू नयेत म्हणून प्रचंड लक्ष ठेवून आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. या आधीची जी चेंगराचेंगरी आणि अन्य दुर्घटना झाल्या त्यांचा अभ्यास करून प्रशासनाने परिस्थितीवर पूर्ण नियंत्रण मिळवले आहे असे योगी म्हणाले. योगी आदित्यनाथ यांनी काही दिवसांपूर्वीच महाकुंभ क्षेत्राचे हवाई सर्वेक्षण केले. लोकांचे जीव जाणे हे कुणालाच आवडत नाही आणि त्यातील राजकारणाचा भाग सोडला तर केवळ पीडितांच्या वेदना समजून घेतल्या जातात, त्यामुळे भविष्यात अशा घटना घडूच नयेत म्हणून योगी आदित्यनाथ, उत्तर प्रदेश प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. या महाकुंभसाठी जगभरातील मुत्सद्दी नेत आले आहेत आणि जगासमोर भारताची नाचक्की होऊ नये म्हणून योगी सरकारची अग्निपरीक्षा आहे हे निश्चित आहे. त्यातून ते निश्चितपणे तरून जातील.

# सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प हवा



आपल्या देशाचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज (१ फेब्रुवारी २०२५) सकाळी ११ वाजता नवीन संसद भवनामध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा व केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा नवीन संसद भवनातील देशाचा चौथा तर आपल्या अर्थमंत्री पदाच्या कार्यकाळातील आठवा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. त्यामुळे देशाचा सर्वात जास्त वेळा केंद्रीय अर्थसंकल्प मांडणाऱ्या नंबर वन झाल्या आहेत. मागील वर्षी 'नवरत्न' व त्या अगोदर 'सप्तर्षी' अर्थसंकल्प मांडला होता. या वर्षी देशाच्या विकासासाठी केंद्रीय अर्थमंत्री कोणत्या नवरत्नांना चालना देणार आहेत हे थोड्याच वेळात समजणार आहे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या अर्थसंकल्पाचा विचार करता आपल्या मखमली पेटारातून आणलेल्या अर्थसंकल्पात विविध योजनांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आलेल्या होत्या. त्याचा फायदा देशातील किती लोकांना झाला याचे उत्तर देशातील सुजाण नागरिकांना आता शोधावे लागेल. कारण आजही देशातील गरिबातील गरीब व्यक्तीला अर्थसंकल्प समजलेला नाही. एखादी योजना गावात राबवली गेल्यावर एखाद्या नेत्याचे नाव लिहून स्थानिक नेते सांगत असतात आमच्या लोकनेत्यांनी आपल्या वाढदिवसाची भेट गावाला दिली. त्यामुळे संकल्प बाजूला राहतो आणि वाढदिवस साजरा केला जातो. अशा योजनांपासून गावकऱ्यांनी दूर राहून शासकीय योजना नि:पक्षपातीपणे राबवल्या गेल्या पाहिजेत तरच अर्थसंकल्पाचा अर्थ देशातील गरिबातील गरीब नागरिकांना समजून त्यांच्या हक्कांची जाणीव होईल.

आपला देश हा गरीब लोकांचा श्रीमंत देश आहे. त्यामुळे देशात उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य प्रकारे वापर केला गेला पाहिजे. हे जर झाले असते तर आज भारत गरिबी मुक्त झाला असता. सन २०२२च्या जागतिक असमानता अहवालाचा अभ्यास केल्यास आपल्या देशात एक टक्का लोकांकडे २१ टक्के उत्पन्न व ३३ टक्के संपत्ती आहे. यावरून आपल्या देशात आर्थिक विषमता किती आहे हे सहज लक्षात येते. देशातील जी असमानता निर्माण झाली आहे ती केंद्रीय अर्थमंत्र्यांना कमी करण्यासाठी धाडसी निर्णय घ्यावे लागतील. देशातील सर्वात जास्त कर देणारे आपले महाराष्ट्र राज्य आहे. याचा विचार करता मागील अर्थसंकल्पात आपल्या राज्यातील मेट्रो विकासाला केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अधिक पसंती दिली होती. यामध्ये मुंबई मेट्रोसाठी रुपये १०८७ कोटी, नागपूर मेट्रोसाठी रुपये ६८३ कोटी आणि पुणे मेट्रोसाठी रुपये ८१४ कोटींची तरतूद करण्यात आली होती. ग्रामीण रस्ते विकासासाठी रुपये ४०० कोटी, कृषी परिवर्तन प्रकल्पासाठी रुपये १५० कोटी, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प रुपये ९०८ कोटी व पर्यावरण पूरक, शाश्वत शेतीसाठी रुपये ५९८ कोटी अशा विविध तरतुदी करण्यात आल्या होत्या. तेव्हा त्यांची अंमलबजावणी करण्यात आली का? याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. कारण या तरतुदींचा फायदा राज्यातील किती गरीब लोकांना झाला हे महत्त्वाचे आहे. तरच भारत गरिबी मुक्त होऊ शकतो. यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांना या अर्थसंकल्पात ठोस उपाय योजना कराव्या लागतील.सध्या देशात कंत्राटी हंगामी कर्मचाऱ्यांनासुद्धा वेतनासाठी संप करण्याची वेळ येत आहे. त्या दृष्टीने संकल्प करावा लागेल. शिक्षणाच्या सोयी जरी केल्या तरी पदवी संपादन केल्यावर त्याला पूर्ण वेतनी पगार व निवृत्ती वेतनाचा आधार मिळालाच पाहिजे. नोकरी देता आली नसेल तर नोकरी मिळेपर्यंत महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे बेकारी भत्ता मिळाला पाहिजे. त्यादृष्टीने केंद्रीय अर्थमंत्र्यांना तरुणाईचा देश म्हणणाऱ्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीसाठी नवीन पावले उचलावी लागतील. तरच भारताच्या आर्थिक प्रगतीला गती मिळेल. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना कराच्या तावडीतून दिलासा द्यावा लागेल. महत्त्वाची बाब म्हणजे जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवून देशातील महागाईवर नियंत्रण ठेवावे लागेल. कारण सध्या देशातील महागाईवर नियंत्रण अतिशय निकडीचे झाले आहे. आपला देश कृषी प्रधान असल्याने शेतीकडे दुर्लक्ष होणार नाही तसेच देशातील शेतकऱ्यांना आपल्या न्याय मागण्यांसाठी दिल्लीच्या वेशीवर जाण्याची वेळ येणार नाही याची काळजी केंद्रीय अर्थमंत्र्यांना घ्यावी लागेल. त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात देशातील प्रत्येक घटकाचा समावेश करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांना सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प सादर करावा लागेल. तेव्हा आपले आर्थिक कारण पुढे करून लोकसभेची निवडणूक न लढविणाऱ्या देशाच्या केंद्रीय अर्थमंत्री देशाच्या विकासाला सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प सादर करून जनसामान्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी कटिबद्ध राहतील. अशी देशातील सर्वसाधारण जनतेची अपेक्षा आहे. तेव्हा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन देशातील जनतेला काय देणार हे त्यांनी नवीन संसद भवनात अर्थसंकल्पाचा पेटारा सकाळी ११ वाजता उघडल्यावर समजेल.

# महाकुंभतील दुर्घटना



उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे घडलेल्या दुर्घटनेमुळे महाकुंभमेळ्याला गालबोट लागले. महाकुंभमेळ्यासाठी देशाच्या कानकोपऱ्यांतून तसेच विदेशातूनही भाविक पवित्र स्नानासाठी येत आहेत. भाविकांची ही संख्या हजारोंच्या नाही तर लाखोंच्या नाही तर करोडोंच्या घरात असल्याने प्रशासकीय यंत्रणेवर ताण निर्माण होणे स्वाभाविक आहे. प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात सहभागी होणाऱ्या करोडो भाविकांची संख्या पाहता उत्तर प्रदेश सरकारच्या नियोजनाची खरोखरीच प्रशंसा करावी तितकी कमीच आहे. महाकुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांनीदेखील चेंगराचेंगरी होणार नाही, दुर्घटना घडणार नाही, याबाबत सतर्कता बाळगणे आवश्यक होते. देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांचे प्रयागराज भूमीवर कोणत्याही आवाहनाशिवाय किंवा निमंत्रण न देता ज्या कारणाने आगमन होते, ते निमित्त म्हणजे महाकुंभमेळा.

पद्मपुराणानुसार कुंभोत्सवाच्या दिव्य संगमाच्या वेळी प्रयागराजमध्ये स्नान करणाऱ्या भाविकांना जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती मिळते, म्हणून या पवित्र ठिकाणी जाऊन स्नान, दर्शन आणि दान केल्याने भाविकांना पुण्य लाभ होतो. कुंभ राशीची गणना तीन प्रमुख ग्रहांच्या आधारे केली जाते. कालचक्रमध्ये ग्रहांचा राजा, सूर्य, राणी चंद्र आणि ग्रहांचा गुरू याला महत्त्वाचे स्थान आहे. या तीन ग्रहांचे विशिष्ट राशींमध्ये होणारे संक्रमण हा कुंभ उत्सवाचा मुख्य आधार असतो. प्रयागराजमध्ये, गुरू वृषभ राशीत आणि सूर्य मकर राशीत असल्याने, माघ महिन्यातील अमावस्येच्या दिवशी चंद्राचा मकर राशीत प्रवेश हा अत्यंत दुर्मीळ योगायोग निर्माण करतो. महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला अनन्यसाधारण महत्त्व असते. या मौनी अमावस्येला महाकुंभमेळ्यात स्नान करण्यासाठी देशविदेशातील कोट्यवधी भाविक सहभागी झाले होते. त्यातच चेंगराचेंगरी झाली. ३० हून अधिक भाविकांचा मृत्यू झाला, शंभराहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. हा प्रशासकीय आकडा असला तरी यात वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांच्या वारसांना उत्तर प्रदेश सरकारकडून ५० लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. ही दुर्घटना घडल्यावर उत्तर प्रदेश सरकारने ज्या प्रकारे पावले उचलली, प्रशासकीय यंत्रणा राबविली, परिस्थितीवर नियंत्रण मिळविले, या सर्व घटना खरोखरीच प्रशंसनीय आहेत. मुळात कुंभमेळ्यात सहभागी कोट्यवधी भाविकांची संख्या, त्यात झालेली चेंगराचेंगरी, त्यातून निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी योगी सरकारने राबवलेली पोलिसी यंत्रणा व जखमींवरील उपचारासाठी आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी राबविलेली यंत्रणा, जखमींना रुग्णालयापर्यंत विनाविलंब पोहोचविण्यासाठी काही मिनिटांमध्ये निर्माण केलेले स्वतंत्र कॉरिडॉर या एखाद्या चित्रपटातील कथानकाला साजेसे दृश्य योगी सरकारने वास्तवात साकारले.

उत्तर प्रदेशचे पोलीस, आरोग्य यंत्रणा, रस्ते व्यवस्था सांभाळणारे वाहतूक पोलीस आणि या सर्वांवर संचलन करणारे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी तसेच या सर्वांचा वेळोवेळी आढावा घेऊन मार्गदर्शन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाकुंभ मेळ्यातील दुर्घटनेनंतर परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजनेतील खरे 'देवदूत' ठरले आहेत, असे म्हणणेदेखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. महाकुंभमधील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेनंतर पंतप्रधान मोदी सातत्याने मुख्यमंत्री योगी यांच्या संपर्कात होते. जखमींच्या उपचाराबाबत माहिती जाणून घेत होते. दिवसभरातील व्यस्त कार्यबाहुल्यातूनही त्यांनी उत्तर प्रदेशातील घडामोडींवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले होते. रवी, चंद्र व गुरू हे गोचरमध्ये विशिष्ट पद्धतीने योग जुळून येतो त्या त्या योगावर त्या ठिकाणी कुंभमेळा भरतो. कधी सहा वर्षे, तर कधी बारा वर्षे, तर कधी १४४ वर्षांनी हे योग येत असतात. आता जर असा योग सहा वर्षांनी आला तर त्यास अर्धकुंभ मेळा म्हणतात. जर असा योग बारा वर्षांनी आला तर तो पूर्ण कुंभ म्हटला जातो आणि असा योग जर १४४ वर्षांनी आला तर तो महाकुंभ मेळा म्हटला जातो. जानेवारी २०२५ मध्ये उत्तर प्रदेशच्या प्रयागराजच्या भूमीवर सुरू असलेला महाकुंभमेळा हा देखील १४४ वर्षांनीच आला असल्याने देशविदेशातील कोट्यवधी भाविकांचे या ठिकाणी आगमन झाले होते. भाविकांच्या स्नानासाठी उत्तर प्रदेश सरकारने प्रयागराज परिसरात असंख्य कुंडांची निर्मिती केली होती. बुधवारी मौनी अमावस्येला अमृतस्नानापूर्वी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर पवित्र स्नान करण्यासाठी दिवसभर मोठ्या प्रमाणात जनसमुदाय त्रिवेणी संगम परिसराकडे जात असल्याने ही दुःखद घटना घडली. ही चेंगराचेंगरी प्रयागराजमधील संगम घाटाजवळ घडली. संगम घाट हे नाव या ठिकाणाच्या आकारामुळे पडले आहे.

हे संगम घाट प्रयागराजमध्ये स्नानासाठी सर्वात महत्त्वाचे स्थान मानले जाते. असे म्हणतात की येथेच यमुना आणि सरस्वती नदी गंगेला मिळते. या ठिकाणी बहुतेक साधू-मुनी स्नान करतात. भाविकही या ठिकाणी स्नानाला सर्वाधिक महत्त्व देतात. उत्तर प्रदेश सरकारने भाविकांच्या स्नानासाठी शेकडोंच्या संख्येने घाट बनविले असतानाही संगम घाटावरच स्नान करण्याचा भाविकांचा मोह या दुर्घटनेस प्रामुख्याने कारणीभूत ठरला आहे. भाविकांना मौनी अमावस्येच्या दिनी स्नानासाठी प्रत्येक कुंभमेळ्यात वाढत चाललेली लाखोंच्या संख्येने वाढत जाणारी भाविकांची संख्या पाहता संगम घाटाचे क्षेत्र देखील प्रत्येकवेळी वाढवले जाते. २०१९ च्या तुलनेत यावेळी गर्दी पाहता संगम घाटाच्या परिसरात वाढ करण्यात आली. याआधी येथे दर तासाला ५० हजार लोक स्नान करू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली होती. मात्र यावेळी महाकुंभात दर तासाला २ लाख लोकांनी स्नान करण्याची तयारी केली आहे. महाकुंभ मेळ्यात घडलेल्या दुर्घटनेमुळे जगाचे लक्ष या प्रयागराजवर केंद्रित झाले आहे.घटना घडल्यावर घटनेची समीक्षा करण्यासाठी अनेकजण आकलन करत असले तरी घटना घडल्यानंतर घटना सावरण्यासाठी, परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उत्तर प्रदेशने राबविलेल्या उपाययोजनांची सर्वत्र प्रशंसा केली जात आहे. घटनेचे पडसाद देशाच्या कानकोपऱ्यांत उमटले असले तरी या घटनेमुळे महाकुंभमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांच्या उत्साहावर फारसा परिणाम झाला नसल्याचे दिसून येत आहे. महाकुंभसाठी स्नानादरम्यान कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होऊ नये म्हणून पाण्याच्या अंतर्गत भागातही विशेष प्रकारची उपाययोजना उत्तर प्रदेश सरकारने राबविली होती. दुर्घटना क्षणिक काळात होते; परंतु दुर्घटना घडूच नये यासाठी आयोजकांना एक-सव्वा वर्ष नियोजनाची तयारी करावी लागते. कोट्यवधींचा सहभाग असलेल्या ठिकाणी कधीही काहीही होण्याची भीती असते. नेमकी चेंगराचेंगरी झाल्याने महाकुंभवर दुर्घटनेचे सावट निर्माण झाले. आयोजन ही सरकारची जबाबदारी असली तरी दुर्घटना घडू नये ही सहभागी होणाऱ्या भाविकांचीही जबाबदारी असते, हे विसरून चालणार नाही.

# राजेश्वर चव्हाण यांच्या उपस्थितीत गेवराईत सदस्य नोंदणीचा शुभारंभ

## सामान्य जनतेत काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेत प्राधान्य देवू-अमरसिंह पंडित

**गेवराई (प्रतिनिधी):** विधानसभेतील विजयामुळे कार्य पद्धतीत बदल होणार नाही, भविष्यातही जमीनीवर राहुन काम करत राहु, राजकीय गट-तट न पाहता सर्वसमावेशक विकास कामे करुन सामान्यांना दिलासा देण्याचे काम आपण सर्वांनी करणे गरजेचे आहे. पक्ष संघटनेतील पदाधिकाऱ्यांची निवड करताना सामान्य जनतेत काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेत प्राधान्य देवून असे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी सांगितले. मराठवाडा विभागात सर्वाधिक सदस्य नोंदणी गेवराई मध्ये होईल असा विश्वास जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांनी व्यक्त केला. गेवराई येथे आयोजित सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. आमदार म्हणुन पहिल्या शंभर दिवसात आ.विजयसिंह पंडित यांनी केलेल्या कामांचा लेखा-जोखा यावेळी अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांसमोर मांडला. मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्याचे गेवराई येथे शनिवार दि. १५ रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, जयभवानीचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, बीड बाजार समितीचे उपसभापती शामराव पडुळे, जिल्हा बँकेचे माजी संचालक दशरथ वनवे, सरपंच संघटनेचे कालिदास नवले, माजलगांव चे माजी सभापती भागवत खुळे, भवानी बँकेचे व्हा. चेअरमन अब्दुल हन्नान, आनंद सरपते, शितलताई धोंडरे, मुक्ताताई आर्दड यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. या प्रसंगी भाऊसाहेब नाटकर यांनी प्रास्ताविक केले तर गजानन काळे, गणेश सावंत, कालिदास नवले, समीर सय्यद, आनंद सरपते यांनी मनोगत व्यक्त केले.आ. विजयसिंह पंडित यांनी आमदार म्हणुन पहिल्या शंभर दिवसात पी.एम. किसान योजनेतील ३,१०० लाभार्थ्यांना लाभ मिळवुन दिला, २२,१८० एपीएल शिधापत्रिका धारकांना २ कोटी ७८ लाख रुपयांचा लाभ मिळवुन दिला. दिव्यांगांसाठी प्रत्येक महिण्याच्या पहिल्या शनिवारी एक दिवसाचे दिव्यांग बोर्ड उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे आयोजित करण्याचा निर्णय केला. उपजिल्हा रुग्णालयात डायलेसिस युनिट, एक्सरे आणि सोनोग्राफी मशिन कार्यान्वीत केल्या. पी.एम. कुसूम योजनेतील प्रलंबित १३० सौर कृषीपंप अस्थापित करुन दिले. गेवराई आगारासाठी नविन बसेस, सिंदफणा नदीवरील टाकळगांव बॅरेज, न्यायालयाच्या विस्तारित इमारत बांधकामासाठी पाठपुरावा, गेवराई शहरातील पाणी पुरवठा योजना आणि रुग्णलयासाठी एक्सप्रेस फिडर, अतिक्रमण धारकांचा हक्काचा पीटीआर आदी विकास कामे करण्यासाठी पाठपुरावा सुरु केल्याबाबतचा लेखा-जोखा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यावेळी उपस्थितांसमोर मांडला.सर्वसामान्य जनतेत जावुन काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेतील पदे देतांना प्राधान्य मिळेल, सर्वांना विश्वासात घेवुन काम करणाऱ्यांना संधी देवु, विकास कामांसाठी निधी वितरीत करतांना ग्रामपंचायतीला विश्वासात घेवु, पक्ष संघटना अधिक मजबुत करण्यासाठी सर्वांनी पुढे येवुन काम करण्याची गरज आहे. पक्षात नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांचा सुद्धा सन्मान होईल असा विश्वास या निमित्ताने प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. सदस्य नोंदणी अभियान केवळ सदस्य वाढीपुरते मर्यादित न राहता भविष्यात सक्षम नेतृत्व घडविण्यासाठी आणि जनसामान्यांपर्यंत पक्षाच्या धोरणांचा प्रचार करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांनी केले. गेवराई येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियान प्रसंगी ते बोलत होते. शितलताई धोंडरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहन गलांडे यांचे विविध मागण्यासाठी अमरण उपोषन

### मागण्या मान्य नाही झाल्या तर २८ तारखेला आमरण उपोषण

**केज । प्रतिनिधी**

केज येथील विविध मागण्यासाठी जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी २८ फेब्रुवारी २०२५ तारखेला आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे या विषयी निवेदनाद्वारे मागण्या आहेत .शासन आदेशानुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्थापन केलेले कक्ष पुन्हा सुरु करणे जर मागण्या मान्य नाही झाल्या तर २८ फेब्रुवारी २०२५ रोजी अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देतो असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे तसेच केज पंचायत समितीचे बीडीओचे अधिकार ग्रामसेवक कडे देणाऱ्या बीडीओ दिवाने यांच्या वर व ग्रामसेवक ओम चोपणे यांच्या वर योग्य ती कारवाई करण्यात




यावी अन्यथा २८ फेब्रुवारी रोजी अमरण उपोषन करण्यात येईल तसेच चिंचोली माळी ते हादगाव मंजूर रोडचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे अन्यथा २८ फेब्रुवारी रोजी अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांना दिला आहे तसेच केज तालुक्यातील काळेगाव येथील जलजिवन मिशन अंतर्गत झालेल्या कामाची चौकशी करण्यात यावी अशा विविध मागण्या मान्य झाल्या नाहीत तर श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे २८ फेब्रुवारी रोजी अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला रोहन गलांडे पाटील यांनी दिला आहे.

# डोंगरी भाग जाहीर करण्यासाठी धरणे आंदोलन

### कातकरवाडी गावकऱ्यांची २५ हजारांची मदत

**गंगाखेड । प्रतिनिधी**

तालुक्यातील डोंगरी भाग जाहीर करण्याच्या मागणीसाठी १ मार्च २०२५ पासून मुंबईच्या आझाद मैदानात बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या तयारीच्या अनुषंगाने गावागावांत जनसंवाद बैठकांचे आयोजन सुरू असून, आज १४ फेब्रुवारी रोजी मौजे कातकरवाडी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले.




बैठकीत कातकरवाडी येथील ग्रामस्थांनी आंदोलनासाठी एकमुखाने २५ हजार रुपये देणगी देण्याचे आश्वासन दिले. डोंगरी जन परिषदेच्या वतीने गावकऱ्यांकडून निधी संकलनाचे आवाहन करण्यात येत असून, या बैठकीत देणगी बुक गावकऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी डोंगरी जन परिषदेचे मुख्य संयोजक पंडितराव घरजाळे, संयोजक गोपीनाथ भोसले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.डोंगरी भागासाठी गेल्या सहा वर्षांपासून स्थानिक जनता लढा देत आहे. नागपूरच्या सुदूर उपयोजन केंद्राच्या माध्यमातून सर्वेक्षण पूर्ण झाले असून, प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला आहे. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा भाग अधिकृतपणे जाहीर करावा, यासाठी डोंगरी जन परिषद आणि स्थानिक गावकरी मोठ्या संख्येने धरणे आंदोलनात सहभागी होणार आहेत.

# मुख्यमंत्री फडणवीस पाठोपाठ गडकरी सहकुटुंब कुंभमेळ्यात

**नागपूर (वृत्तसंस्था):** नागपूरचे खासदार व केंद्रीय मंत्री नितिन गडकरी सहकुटुंब कुंभ स्नानासाठी रविवारी प्रयागराजला गेले. तेथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांचे विमानतळावर स्वागत केले. गडकरी यांच्या कार्यालयाने ही माहिती दिली.

प्रयाग राजांमध्ये सध्या कुंभमेळा सूरू आहे. नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहकुटुंब प्रयागराजला गेले होते. तेथे त्यांनी कुंभ स्नान केले. त्यापाठोपाठ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी त्यांच्या सर्व कुटुंबासह प्रयाग राजांमध्ये दाखल झाले. तथे त्याच्या स्वागताला खुद्द मुख्यमंत्री योगीच उपस्थित होते. विमानतळावर त्यानी गडकरीचे स्वागत केले. यावेळी कांचन गडकरी उपस्थित होत्या.




गडकरी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यातील मैत्री सर्वश्रुत आहे. योगी नागपूरला आल्यावर गडकरींच्या निवासस्थानी भेट देतात. लोकसभा निवडणुकीत गडकरींच्या प्रचारासाठी योगी यांनी नागपुरात प्रचारसभा घेतल्या होत्या. गडकरी सुध्दा उत्तर प्रदेशमध्ये प्रचाराला गेले होते. गडकरी यांच्या राष्ट्रीय महामार्ग बांधणी मंत्रालयाचे अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प उत्तर प्रदेशमध्ये सुरू आहेत. त्यामुळे गडकरी कामासाठी प्रयागराजला येताच योगी त्यांच्या स्वागतासाठी विमानतळावर गेले.प्रयागराज मधील कुंभमेळा आता विविध कारणांसाठी चर्चेत आहे. तेथे देशभरातून भाविक जात आहेत. त्यामुळे तेथे होणारी गर्दी, गंगास्नान, त्यासाठी करावी लागणारी पायपीट या सर्व बाबींची चर्चा माध्यमांमध्ये आहे. मौनी अमावस्येला झालेल्या चेंगराचेंगरीतील मृत्यूंचा आकडा अद्याप जाहीर केला जात नाही. जो आकडा दिला जातो तो खोटा असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून केला जात आहे. त्याच बरोबरीने कुंभमेळ्याच्या ठिकाणी व्हीआयपींसाठी केलेली व्यवस्था चर्चेत आहे. त्यांच्या सोयीसाठी सरकारने लालगालिचा टाकला असा आरोप केला जात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रयाग राजांमध्ये सहकुटुंब दाखल झाले आहे.

# नागपूरच्या डोरली गावात दारुगोळा कंपनीत भीषण स्फोट:दोन कामगारांचा जागीच मृत्यूच

**नागपूर (वृत्तसंस्था):** नागपूर येथील डोरली गावात दारुगोळा तयार करणाऱ्या कारखान्यात भीषण स्फोट झाला असल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला असल्याचे समजते. हा स्फोट झाला तेव्हा काही कामगार या कंपनीत असल्याची माहिती समोर आली आहे.

एका खाजगी कंपनीत हा स्फोट झाला असून या ठिकाणी स्फोटक संबंधीत साहित्य तयार केलं जात असल्याची प्रथमिक माहिती पुढे आली आहे. मात्र, नेमका हा स्फोट कशामुळे झाला? हे अद्याप कळू शकलेले नाही. परंतू हा स्फोट इतका भीषण होता की यात दोन कामगार मृत्युमुखी पडल्याची प्रथमिक माहिती पुढे आली आहे.

रविवार दिनांक १६ फेब्रुवारीच्या दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली आहे. हा स्फोट इतका भीषण होता की यात कंपनीमधील छप्पर मजूरांवर पडून आणि आगीत होरपळून दोन कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर मृतकांचा आणि जखमींचा आकडा वाढण्याची शक्यता ही बाळवली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. सध्या पुढील कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे. मात्र या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



# शिवसेना फक्त शिंदेंचीच, ठाकरेंचा काडीचाही संबंध नाही:रामदास कदम

**रत्नागिरी (वृत्तसंस्था):** शिवसेना फक्त आणि फक्त एकनाथ शिंदे यांचीच आहे. उद्धव ठाकरे यांचा शिवसेनेशी काडीचाही संबंध नाही, अशी टीका रामदास कदम यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेससोबत जाऊन पाप केले, असा आरोपही त्यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसमध्ये जाऊन खूप मोठे पाप केले. त्या पापाची फळे उद्धव ठाकरेंना भोगावीच लागतील, असेही ते म्हणालेत.

एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काल रत्नागिरीत आभार सभा पार पडली. या सभेत हजारो शिवसैनिक उपस्थित होते. शिवसेना ही भगवा झेंड्याचीच आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचीच आहे. उद्धव ठाकरे यांचा कोकणाशी आणि शिवसेनेशी काहीचाही संबंध नाही. यावर काल कोकणवासियांनी शिक्कामोर्तब केले. ठाकरे गटात शिल्लक असलेले अनेक लोक, पुढारी आणि नेते यांनी काल शिवसेनेत जाहीर प्रवेश केला, असेही रामदास कदम म्हणाले.यावेळी बोलताना रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसेनेबाबत मोठे भाकित केले. एक दिवस असा येईल मातोश्रीमध्ये फक्त उद्धव ठाकरे आणि त्यांचे कुटुंब याशिवाय इतर कोणीही राहणार नाही. त्यांच्या शिवसेनेत त्यांच्या पाठीशी कुणीही उभे राहणार नाही, असे ते म्हणालेत. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसमध्ये जाऊन खूप मोठे पाप केले. त्यांनी बाळासाहेबांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले. त्या पापाची फळे उद्धव ठाकरेंना भोगावीच लागतील, असा दावा रामदास कदम यांनी केला.

# भाजपाचे पाचही आमदार प्रथमच मुख्यमंत्र्यांसोबत एकाच मंचावर


**चंद्रपूर (वृत्तसंस्था):** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ३६ दिवसात तीन वेळा या जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले. प्रत्येक दौऱ्याप्रसंगी एखाद आमदाराची कार्यक्रमाला अनुपस्थिती असायची. त्यामुळे माध्यमांमध्ये तशा बातम्या झळकायच्या. मात्र आजच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील पाचही आमदार तसेच पालकमंत्री व मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष असे भाजपाचे सर्वच नेते मंडळी एकाच मंचावर एकत्र आल्याने आजचा दिवस 'व्हॅलनटाईन डे' ठरला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर १० जानेवारी ते १६ फेब्रुवारी या ३६ दिवसात मुख्यमंत्र्यांनी चंद्रपूर जिल्ह्याचा तीन वेळा दौरा केला. १० जानेवारी रोजी माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी कार्यक्रमाला फडणवीस यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर उपस्थित होते. मात्र माजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह अन्य आमदार गैरहजर होते. त्यानंतर ९ फेब्रुवारी रोजी महारोगी सेवा समिती व आनंदवनच्या स्थापनेला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांनी उपस्थिती दर्शविली. त्या कार्यक्रमाला पालकमंत्री अशोक उईके, आमदार किशोर जोरगेवार, अमादार करण देवतळे यांनी उपस्थिती दर्शविली. मात्र माजी पालकमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्यासह भाजपाचे इतर आमदार अनुपस्थित होते. त्यामुळे मुनगंटीवार मुख्यमंत्र्यांवर नाराज आहेत. एका मंचावर येत नाही. मुख्यमंत्री दोन वेळा जिल्ह्यात आल्यानंतरही मुनगंटीवारांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठ फिरवली अशा आशयाच्या बातम्या माध्यमात झळकल्या. मात्र सन्मित्र नागरी सहकारी बँकेच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह भाजपाचे पाचही आमदार अनुक्रमे आ. कीर्तीकुमार भांगडीया, आमदार किशोर जोरगेवार, आमदार देवराव भोंगळे, आमदार करण देवतळे तसेच पालकमंत्री डॉ.प्रा.अशोक उईके असे सारेच एकत्र आले.राज्यातील सत्तास्थापनेनंतर जिल्हा भाजपात मोठ्या प्रमाणात दुफळी दिसून येत होते. पालकमंत्री अशोक उईके यांच्या प्रथम आगमनात तसेच मुख्यमंत्र्यांच्या ही प्रथम आगमन प्रसंगी ती दिसून आली होती. मात्र आता ३६ व्या दिवशी ३६ आकड्याने काडीमोड घेतला असून भाजपाचे सर्वच आमदार मुख्यमंत्र्यांसोबत कार्यक्रमाला उपस्थित झाल्याने सर्वकाही आलबेल आहे असा संदेश या माध्यमातून देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांनी दिला.माजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोरवा विमानतळावर समर्थकांसह स्वागत केले. तसेच संपूर्ण कार्यक्रमालाही अन्य आमदारांसह उपस्थिती दर्शविली. त्यामुळे आज येथे खऱ्या अर्थाने व्हॅलेनटाईन डे चे चित्र बघायला मिळाले.

# जवळा फकीर येथे आज होणार पहिली बौद्ध धम्म परिषद–भदंत पय्यातीस महाथेरो

**बीड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक भदंत पय्यातीस महाथेरो यांनी केले आहे.



या धम्म परिषदेचे उद्घाटन १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे. तर धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, पूर्णा हे असणार आहेत. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर महाबोधी वंदना होईल. तर सकाळी ११ ते १२:३० यादरम्यान भिक्खू संघास भोजनदान आणि त्यानंतर दुपारी १ वाजता धम्मदेसनेस सुरुवात होणार आहे. धम्म परिषदेस डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो, डॉ. भदंत इंदवंस महाथेरो, विपस्सनाचार्य भदन्त पय्यारत्न थेरो, भदन्त पय्याबोधी थेरो, भदन्त मुदितानंद थेरो, भदन्त ज्ञानरक्षित थेरो, भदन्त महाविरो थेरो, भदन्त पय्यानंद थेरो, भदन्त पय्याशील थेरो, भिक्खू धम्माल थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू पय्यावर्धन, भिक्खू संघरत्न, भदन्त धम्मघोष यांची धम्मदेसना होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून आ. प्रकाश दादा सोळंके, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबीरे, प्रा. प्रदीप रोडे, राजेंद्र कांबळे, प्रकाशजी कोकाटे, भाई कीर्तीकुमार बुरांडे, जवळा फकीरचे सरपंच त्र्यंबक साबळे, माजी सरपंच सुनीता मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेस धम्म बांधवांनी व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भदन्त पय्यातीस महाथेरो यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त बीड मध्ये जय छत्रपती शिवाजी–जय भारत पदयात्रा

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनाचा युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी जय छत्रपती शिवाजी–जय भारत पद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य व राष्ट्राच्या शाश्वत विकासात युवकांचे मोलाचे योगदान आहे. युवकांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होऊन व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवाभाव तसेच शासकीय उपक्रमाबाबत माहिती व सहयोग यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील पदयात्रा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता जिल्हा क्रीडा संकुल सहयोग नगर, येथून निघणार असून ती सारडा कॉम्प्लेक्स चौक शहर पोलीस स्टेशन चौक, सुभाष रोड मार्गे भाजी मंडई चौक बहीण




चौक व छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाणार आहे.

पदयात्रा सकाळी नऊ वाजता सुरू होणार असून याचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी साडेदहा वाजता होणार आहे यात अधिकाधिक युवकांनी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.पदयात्रेबाबतचा आढावा आज एका बैठकीत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घेतला.

या पदयात्रेत नववी ते अकरावी वर्गातील स्काऊट गाईड विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी, विद्यार्थिनी खेळाडू, नागरिक शासकीय अधिकारी कर्मचारी आदी सहभागी होणार आहेत. यात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# सुरेश धस–धनंजय मुंडे यांच्या भेटीत गैर का ?:या भेटीकडे काहीतरी वेगळे झाल्यासारखे पाहू नका–उपमुख्यमंत्री अजित पवारांची प्रतिक्रिया

**पुणे (वृत्तसंस्था)**

भाजप आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरण लावून धरत धनंजय मुंडे यांच्यावर 'आकाचे आका' म्हणत टीकेची झोड उठवली होती. पण आता त्यांनीच धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याने त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. एकीकडे सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीवर विरोधकांकडून टीका होत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र या भेटीचे समर्थन केले आहे. सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीत गैर काय असा सवाल अजित पवार यांनी केला. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आपल्याला सुसंस्कृतपणा शिकवला आहे, असेही ते म्हणाले.

पुणे महापालिकेच्या वर्धापनदिन निमित्त पुण्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पालिका इमारतीला भेट दिली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पत्रकारांनी त्यांना सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीबाबत विचारले असता, त्यांनी पत्रकारांचीच शाळा घेतली. कोण कुणाला भेटले तर तुला काय वाईट वाटतंय? तुला वाईट वाटायचे काय कारण? असा सवाल करत अजित पवारांनी पत्रकाराला ऐकवले. धनंजय मुंडे मंत्री आहेत. सुरेश धस आमदार आहेत. मुंडे आजारी असल्याने धस यांनी त्यांची भेट घेतली. शेवटी हे राज्य यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांनी चालते. आपल्याला त्यांनी सुसंस्कृतपणाची शिकवण दिली आहे. त्यामुळे कोण कोणाला भेटले यात दुष्मनी पाहायची नसते. तुमचाच एखादा पत्रकार मित्र आजारी असेल, ज्याच्याशी तुमचे पटत नसेल, अशा मित्राची विचारपूस तुम्ही करणार नाही का? असे म्हणत अजित पवार यांनी



पत्रकारांनाच ऐकवले.आमची महायुती होण्यापूर्वी देखील चंद्रकांत पाटील आणि आम्ही भेटायचो बोलायचे. आमची काही दुश्मनी नाही. त्यावेळी आमची विचारधारा वेगळी होती. आता आमची विचारधारा एक झाली आहे. त्या पद्धतीने आम्ही पुढे चालेलो आहोत. सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांचे पूर्वीपासूनचे संबंध आहेत. जर तुम्ही आजारी पडला तर सहकारी पत्रकार म्हणून माणुसकीच्या नात्याने तुम्हाला पण भेटायला येतात ना? त्यामुळे या भेटीकडे काहीतरी वेगळे झालंय असे पाहू नका, असा सल्लाही अजित पवार यांनी माध्यमांना दिला.अजित पवार यांनी यावेळी बोलताना संतोष देशमुख यांच्या कुटुंबावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. संतोष देशमुख यांची हत्या अत्यंत क्रूरपणे झालेली आहे. कोणालाही त्याचे वाईट वाटणारच. त्यांची पत्नी असेल दोन लहान मुले असतील, बंधू असतील त्यांचे कुटुंब असेल. त्या सगळ्यांच्या मनामध्ये ही भावना येणे साहाजिकच आहे. त्यामुळे त्यांच्या मागण्या योग्यच आहेत. आभाळ कोसळल्यानंतर प्रत्येकाची संतप्त भावना असते.आमचा प्रयत्न आहे, की न्यायालयीन चौकशी, सीआयडी, एसआयटी यांच्याकडून या प्रकरणातील रिपोर्ट लवकरात लवकर यावेत, मुख्यमंत्री सांगत आहेत, मी पण सांगतोय, या प्रकरणात कोणीही दोषी असेल, त्यांची कोणाचीच गय केली जाणार नाही. ज्याच्या पर्यंत धागेदोरे पोहोचतील त्यांना कडक शासन केले जाईल. तपासाला वेळ लागतो. आज ६० दिवस झाले पण त्यातील एक व्यक्ती अजूनही सापडत नाही, असे होत नाही पण दुर्दैवाने तो सापडत नाही, त्याला पकडण्याचे प्रयत्न सुरू आहे, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

# लाडक्या बहिणींची घरी जाऊन होणार पडताळणी

## फेब्रुवारीच्या हप्त्यासाठी मार्च उजाडणार?

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महायुती सरकारने आपल्या महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. या अंतर्गत लाभार्थी महिला या योजनेचे निकष पूर्ण करतात का? याची घरोघरी जाऊन छाननी केली जात आहे. त्यामुळे ही पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच लाभार्थी महिलांना या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मिळणार असल्याचा दावा केला जात आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. यामुळे अनेक निराधार महिलांना हक्काची मदत मिळाली आहे. पण यात अनेक खोटे लाभार्थीही आढळून येत आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. या अंतर्गत पात्र महिलांच्या घरी चारचाकी वाहन आहे का? किंवा त्या या योजनेतील पूर्ण निकष पूर्ण करतात का? याची पडताळणी केली जाणार आहे. यामुळे ही पडताळणी पूर्ण होईपर्यंत महिलांना फेब्रुवारीचा



हप्ता मिळणार नाही असे सांगितले जात आहे. या प्रकारामुळे महिला वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तब्बल २ कोटी ५९ लाख लाभार्थी आहेत. त्यांना दरमहा ३ हजार ८८५ कोटी रुपयांची रक्कम सरकारी तिजोरीतून दिली जात आहे. या योजनेतील हजारो महिलांना सरकारच्या इतरही योजनांचा लाभ मिळत आहे. यात संजय गांधी निराधार योजना व नमो शक्ती योजनेतील लाभार्थ्यांचाही समावेश आहे. पण आता या दोन्ही योजनांसह स्वतःहून लाडकी बहीण योजनेचा लाभ नाकारणाऱ्या महिलांचा आकडा ५ लाख ४० हजारांपर्यंत पोहोचला आहे.विशेषतः पडताळणीत अनेक महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्या जाण्याची शक्यता आहे. यामुळे हा आकडा आणखी काही लाखांत पोहोचण्याची शक्यता आहे. सरकार या पडताळणीसाठी अंगनवाडी सेविकांची मदत घेत आहे. त्यांना या योजनेतील लाभार्थी महिलांच्या नावांची यादी दिली गेली आहे. त्याचा पडताळणी अहवाल पुढील ८ दिवसांत शासनाला सादर होईल. त्यानंतर फेब्रुवारीचा हप्ता वितरित केला जाईल. या सर्व प्रक्रियेसाठी मार्च महिना उजाडण्याची शक्यता आहे. या पडताळणीमुळे सरकारने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा लाभ थांबवल्याचेही सांगितले जात आहे.

दुसरीकडे, लाडकी बहीण योजनेवर अमाप खर्च होत असल्यामुळे सरकारच्या विविध विभागांच्या खर्चाला कात्री लावण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या वित्त विभागाचा सन २०२४–२५ चे सुधारित अंदाजपत्रकावरून ही बाब स्पष्ट झाली आहे. या अंदाजपत्रकात सरकारी विभागांनी किती निधी खर्च करावा याचे अनुमान घालून देण्यात आले आहे. एकूण वार्षिक तरतुदीच्या ७० टक्के निधीच खर्च करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्यात. या ७० टक्क्यांपैकी निवृत्ती वेतन, शिष्यवृत्ती व विद्यावेतन, सहाय्यक अनुदानित वेतन, कर्ज व कर्जाची परतफेड, अंतरलेखा हस्तांतरे या विभागांना १०० टक्के निधी खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी नवा फॉर्म्युला

# भाजपचे तिकीट हवे तर एक हजार सदस्य नोंदवा–मंत्री बावनकुळे

**नांदेड (वृत्तसंस्था)**

भाजपचे सक्रिय सदस्य होण्यासाठी किमान ५० घरी जाऊन प्राथमिक सदस्यांची नोंदणीकरावी लागेल. तसेचजिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका किंवा मनपा निवडणूक भाजपच्या तिकिटावर लढवायची असल्यास किमान १ हजार सदस्य नोंदणी करणे बंधनकारक आहे. सरपंचते खासदारांनी संघटन पर्वात सहभाग घेतल्याने भाजपची १ कोटी १० लाख सदस्य नोंदणीझाली आहे. उर्वरित ४० लाख सदस्यांचीनोंदणी लवकरच पूर्ण केली जाईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.



भाजपची नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर या चार जिल्ह्यांची संघटन पर्व मराठवाडा विभागीय बैठक झाली. त्यासाठी बावनकुळे नांदेड दौऱ्यावर आले होते. या वेळीपक्षाचे कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि खासदार अशोक चव्हाण यांच्या सहपदाधिकारी उपस्थित होते.मागणीनुसार पुरवठा या पद्धतीने ज्याजिल्ह्याला जितकी वाळू लागेल, तितकीउपलब्ध करून दिली जाईल. दोन वर्षांतयाबाबत मोठे परिवर्तन दिसेल. आमच्याधोरणामुळे वाळू मुबलक प्रमाणात उपलब्धहोईल आणि माफियागिरी संपेल, असाविश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच मागील दहावर्षांपासून नांदेड आयुक्तालयाच्या विषयावरनिर्णय घेऊ असे बावनकुळे म्हणाले.

# भाजप बूथ प्रमुखाची हत्या होतेय आणि ते प्रकरण मिटविण्याची भाजपाच्या प्रदेशाध्यक्ष यांची भाषा करणे हे दुर्दैव–धनंजय देशमुख

## खा.सुप्रिया सुळे घेणार आज संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट

**केज । गौतम बचुटे**

भाजपचे बूथ प्रमुख असलेले संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे व निर्घृण हत्या केली जाते हे दुर्दैव आहे परंतु ते प्रकरण मिटविण्याची भाषा भाजपच्याच प्रदेशाध्यक्षांनी करणे हे दुर्दैव असल्याची वक्तव्य संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी केले आहे. उद्या राष्ट्रवादी काँगेस शरद पवार पक्षाच्या खा. सुप्रियाताई सुळे या मस्सा जोग येथे येणार असून त्या देशमुख कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन करणार आहेत.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी हाय–वे वरून अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे व निर्घृणपणे खून करण्यात आला. सरपंच संतोष देशमुख हे भाजपचे क्रियशिल सदस्य होते आणि ते भाजपचे बूथ प्रमुख होते. परंतु त्यांची हत्या झालेली असताना त्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्या ऐवजी भाजपचेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे संतोष देशमुख यांचे प्रकरण मिटविण्याची भाषा करणे हे दुर्दैवी असल्याची खंत संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुखाने व्यक्त केले आहे. तसेच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी मराठा योद्धे मनोज जरांगे हे प्रयत्न करीत असून सर्व समाजबांधव हे संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावर लटकवले जावे अशी मागणी करीत आहेत. मनोज जरांगे आणि समाज बांधव हे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीय सोबत आहेत. असा विश्वास देखील धनंजय देशमुख यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे.राष्ट्रवादी काँगेस शरद पवार पक्षाच्या खा. सुप्रियाताई सुळे या दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:०० वा. मस्साजोग येथे येणार आहेत. त्या सकाळी ९:०० वाजता हेलिकॉप्टरने मस्साजोग येथे हेलिपॅडवर आगमन होणार असून त्या नंतर कारने मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबांची भेट घेवून सांत्वन करणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077